# जिल्हा परिषद,नंदुरबार
## (आरोग्य विभाग)

नवीन प्रशासकीय इमारत पहिला मजला, टोकरतलाव रोड, नंदुरबार - 425412

ईमेल- dhondb1@rediffmail.com,ri.nandurbar@gmail.com दूरध्वनी क्रमांक : 02564-210235


जा.क्र.जिपनं/ आरोग्य / परवानगी / 100 / 2025 दि. 28.04.2025

**प्रति,**

**डॉ. माने मेडिकल फाउंडेशन अँड रिसर्च सेंटर**
**राहुरी, अहमदनगर**

**विषय :-** डॉ. माने मेडिकल फाउंडेशन अँड रिसर्च सेंटर या संस्थेमार्फत अक्कलकुवा , धडगाव, तळोदा तालुक्यात सन 2025-26 व 2026-27 या वर्षात माता व बाल आरोग्य प्रकल्प राबवण्यासाठी सहकार्य व परवानगी बाबत

**संदर्भ :-** 1. डॉ. स्वप्नील माने ( MBBS,DGO,FCPS, DNB, MICOG) Reg. No. 2005/08/3327 यांच्या कडील प्रस्ताव दिनांक 31.01.2025

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये, संदर्भ अन्वये महाराष्ट्रातील दुर्गम ग्रामीण आणि आदिवासी भागामध्ये आरोग्य सेवा उपलब्ध करून देतात त्यात विशेषतः कर्करोग नियंत्रण, जागरूकता, प्रतिबंध आणि लवकर निदान कारण आहात.
त्याअनुषंगाने नंदुरबार जिल्ह्यात सन 2025-26 व 2026-27 या वर्षात अक्कलकुवा, धडगाव व तळोदा या तालुक्यातील खालील तक्ता अ मध्ये नमूद निवडक गावांमध्ये "माता व बाल मृत्यू दर कमी करणे" हा प्रकल्प अंतर्गत एक्सपोर्ट इम्पोर्ट बँक ऑफ इंडिया ( एक्झिम बँक) च्या सहकार्याने गावात मोबाइल आरोग्य युनिट मार्फत वैद्यकीय पथकामार्फत राबवण्यात येणार असल्याने आरोग्य प्रकल्प राबवण्यासाठी सहकार्य व परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

तक्ता अ

| अक्कलकुवा | | | | धडगाव | | तळोदा | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | खुर्चीमाळ | 12 | चिवलउतार | 22 | शेलखेडी पाडा | 32 | भवर |
| 2 | गोजराबारी | 13 | वेहगा | 23 | खुंटामोडी | 33 | रेवानगर |
| 3 | शेल्तापानी | 14 | हुणाखांब | 24 | शेलगदा | 34 | बेलीपाडा |
| 4 | भराडी पाडा | 15 | केवडी | 25 | गोराडी | 35 | नर्मदा नगर |
| 5 | ओघणी | 16 | कुकडीपादर | 26 | कुंभारी | 36 | सोरापाडा |
| 6 | दहेल | 17 | डनेल | 27 | कुवरखोत | 37 | सिंगपूर |
| 7 | वेरी | 18 | बामणी | 28 | वेलखेडी | 38 | अलीविहीर |
| 8 | भगदरी | 19 | मोकास | 29 | मक्तारझीरा | 39 | इच्छागव्हान |
| 9 | बेडाकुंड | 20 | बगद | 30 | खामला | 40 | तळवे |
| 10 | वाडीबार | 21 | खोडी | 31 | मुंडलगाव | - | - |
| 11 | नेंदवन खु. | - | - | - | - | - | - |

उक्त अक्कलकुवा तालुक्यातील 21 गावे , धडगाव तालुक्यातील 10 गावे व तळोदा तालुक्यातील 9 गावे असे एकुण 20 गावांमध्ये माता व बाल आरोग्य करिता शिबिर आयोजित करणे , मोबाइल मोडीकल युनिट व्दारे वैद्यकीय पथकामार्फत वैद्यकीय सेवा पुरवेण, औषधोपचार, तपासण्या उपचार मोफत उपलब्ध करून देणे, संबंधित कार्यक्षेत्रातील प्रा.आ.केंद्र , उपकेंद्र या आरोग्य संस्थेशी समन्वयाने कामकाज करणे, वैद्यकीय अधिकारी,सामुदाय आरोग्य अधिकारी, आशा सेविका, यांच्या सहभागाने कार्य करणे व आनुषंगिक उपक्रम राबवणे या करिता आपल्या संस्थेस परवानगी देण्यात येत आहे.

Scanned with OKEN Scanner

याकरिता इकडील कार्यालयाकडून अथवा प्रा.आ.केंद्र, उपकेंद्र मार्फत कुठल्याही प्रकारचे अनुदान अथवा निधि देय असणार नाही, त्याच बरोबर आपल्या संस्थेमार्फत आयोजित करण्यात येणारे शिबिरे अथवा उपक्रम मार्फत देण्यात येणारी संपूर्ण आरोग्य सेवा सर्वांसाठी निशुल्क राहील , कुठल्याही प्रकारची फी देय असणार नाही या अति व शरतीस आधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

दरमहा होणारे उपक्रम बाबतचा मासिक अहवाल संबंधित प्रा.आ.केंद्र, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयास सादर करण्यात यावा.

सदर संस्थेमार्फत राबवण्यात येणा-या उपक्रमात सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग व योग्य ते सहकार्य करण्यात यावे.

डॉ. रविंद्र सोनवणे
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद नंदुरबार

**प्रत सविनय सादर :**

1.मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव :**

1.तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती अक्कलकुवा / धडगाव / तळोदा
2.वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र ............. ता. अक्कलकुवा / धडगाव / तळोदा

Scanned with OKEN Scanner